# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 : ठळक वैशिष्ट्ये

1. **5+3+3+4 शैक्षणिक रचना** -10+2 पद्धतीऐवजी : ३ ते ८ वर्षे या वयोगटासाठी पूर्वतयारी स्तर, ८ ते ११ वर्षे या वयोगटासाठी पायाभूत स्तर, ११ ते १४ वर्षे या वयोगटासाठी पूर्व माध्यमिक स्तर आणि १४ ते १८ वर्षे या वयोगटासाठी माध्यमिक स्तर अशी रचना तयार केली आहे.
2. **बालपणातील शिक्षण (Early Childhood Care and Education - ECCE) :** बालपणीच्या सर्व संबंधित विकासात्मक क्षेत्रांचा विचार करून समग्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.
3. **मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान** - इयत्ता 3 पर्यंत सर्व मुलांनी वाचन, लेखन आणि गणिताचे मूलभूत कौशल्य मिळवावे.
4. **अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :** चिकित्सक विचार, निर्णय क्षमता आणि सर्जनशीलता, नैतिक, मानवी आणि घटनात्मक मूल्ये यांसारख्या क्षमता व मूल्य विकासावर भर द्यावा आणि धोरणपटी आधारित शिक्षणऐवजी आकलन आधारित शिक्षणावर भर द्यावा.
5. **बहुविषयात्मक, सर्वांगीण आणि एकात्मिक शिक्षण :** सर्व ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी बहुविषयाशी विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानवविद्या, क्रीडा क्षेत्रावर लक्ष केंद्रित करावे.
6. **मातृभाषा / स्थानिक भाषेत शिक्षण** - इयत्ता 5 पर्यंत, शक्य असल्यास इ.8 पर्यंत शिक्षण मातृभाषेत.
7. **तीन भाषा सूत्र** - विद्यार्थ्यांनी तीन भाषा शिकाव्यात - त्यातील किमान दोन भारतीय असाव्यात.
8. **बहुभाषिकता :** भारताचा बहुभाषिक वारसा आणि अनेक भाषा शिकण्याचे फायदे लक्षात घेतला जातो, हे धोरण भारतातील मूळ भाषांसह अनेक देशी व विदेशी भाषा शिकण्यावर भर देते.
9. **कलासाहित्य, हस्तकला, संगीत, नृत्य, योग यांचा समावेश** - सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी.
10. **कौशल्य-आधारित शिक्षण** - व्यावसायिक शिक्षणाचा समावेश इयत्ता 6 पासूनच, इंटर्नशिपसह.
11. **माध्यमिक स्तरात विषय निवडीचे स्वातंत्र्य :** माध्यमिक शाळांमध्ये शारीरिक शिक्षण आणि निरामयता, कला शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्यांसह अभ्यासाच्या विषयांची लवचिकता आणि निवड संधीची शिफारस करते. जेणेकरून, विद्यार्थी अभ्यासाचे स्वतःचे मार्ग आणि भविष्यातील योजना तयार करू शकतील.
12. **शैक्षणिक क्रेडिट बँक (ABC)** - विद्यार्थ्यांचे शिक्षण 'क्रेडिट' स्वरूपात नोंदवले जाईल व वापरता येईल.

13. **विद्यार्थी मूल्यांकन प्रणालीत सुधारणा** - फक्त परीक्षेवर आधारित नाही, तर ३६० डिग्री समग्र मूल्यांकन.

14. **PARAKH संस्था** - मूल्यांकनासाठी राष्ट्रीय संस्था - "Performance Assessment, Review and Analysis of Knowledge for Holistic Development".

15. **शाळा संकुल संकल्पना (School Complexes)** - छोट्या शाळांचे एकत्रिकरण व संसाधन वाटप.

16. **नवीन शिक्षक शिक्षण प्रणाली** - 4 वर्षांचा एकत्रित B.Ed. अभ्यासक्रम अनिवार्य.

17. **TET सह मूल्यांकनाधारित शिक्षक भरती** - शिक्षक भरतीसाठी TET, मुलाखत, डेमो क्लास आवश्यक.

18. **शिक्षकांसाठी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (CPD)** - वर्षाला किमान 50 तास प्रशिक्षण बंधनकारक.

19. **विद्यार्थी केंद्रित शिक्षण** - सर्जनशीलता, विचारशक्ती, संवादकौशल्य वाढवणाऱ्या पद्धतींवर भर.

20. **ऑनलाइन शिक्षणाचा समावेश** - DIKSHA, SWAYAM, NDEAR यांसारख्या पोर्टल्सचा वापर.

21. **राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (NETF)** - शिक्षणात तंत्रज्ञानाच्या वापरासाठी स्वतंत्र मंच.

22. **विद्यार्थ्यांवर ताण कमी करण्याचा प्रयत्न** -पाठ्यपुस्तक मधील आशय, माहिती कमी करण्यावर भर, चिंतनासाठी अधिक वेळ, त्यामुळे विचार शक्तीला चालना मिळणार.

23. **भारतातील रुजलेल्य मूळ परंपरा -** केवळ विचाराच नव्हे, तर भावना, बुद्धीने आणि कृतीतही भारतीय असल्याचा अभिमान विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, तसेच मानवी हक्क, शाश्वत विकास आणि जागतिक कल्याणासाठी जबाबदार बांधिलकीचे समर्थन करणारे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि स्वभाववृत्ती विकसित करून खरा अर्थाने जागतिक नागरिकत्व प्रतिबिंबित करणे हे या धोरणाचे ध्येय आहे.

24. **समाजसन्मुख व नैतिक शिक्षण** - मूल्यशिक्षण, संविधानिक मूल्ये व सामाजिक भान वाढविणे.

25. **समावेशक शिक्षण** - दिव्यांग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांसाठी विशेष योजना.